# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- २,०५,५५,३४,५२,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१) | १३९७ | १०० | कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बदलापूर (पूर्व) भागातील कवठेवाडी स्मशानभूमी-स्प्रिंग वुड पार्क सोसायटी-नवीन पनवेल बायपास हा रस्ता कच्चा असल्याने कवठेवाडीकडे जाणा-या नागरीकांची होणारी गैरसोय, त्याच प्रमाणे कवठेवाडी मार्गावर असलेल्या स्मशानभुमीमध्ये अंत्यविधीसाठी येणा-या नागरीकांचीही मोठी गैरसोय होत असणे, रस्ता कच्चा असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखल होत असल्याने या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनधारकांसह नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, सदर कच्च्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याबाबत वारंवार नागरीकांकडून होत असलेली मागणी, उक्त रस्त्याचे तात्काळ काँक्रीटीकरण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. मनोज जामसुतकर** |
| (२) | १२६६ | १०० | दक्षिण मुंबईतील सॅण्डहर्स्ट रोड स्थानकावरील हॅकॉक पूलाचे काम गेल्या १० वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असणे, सदर पूलाचे बांधकाम २०१९ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असतानाही अद्यापपर्यंत काम पूर्ण झालेले नसणे, सदर पुलाच्या दुसऱ्या बाजूला रेल्वे हद्दीतील गर्डर टाकण्यात आलेला असून पोहोच रस्ते तयार करण्यासाठी म्हाडाच्या सुमारे ६ ते ७ जुन्या उपकर प्राप्त इमारती हटवाव्या लागणार असणे, सदर इमारतीतील निवासी आणि व्यावसायिक गाळे धारकांचे पुनर्विकास म्हाडाने करायची की पालिकेने याबाबत वाद सुरू असणे, शासनाने उक्त पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | १३६९ | १० | सांगोला नगरपरिषद हद्दीत वाढती लोकसंख्या लक्षात घेता दररोज मोठ्या प्रमाणात ओला घनकचरा निर्माण होत आहे. मात्र या ओल्या कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असलेले कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प किंवा बायोगॅस प्रकल्प उभारलेले नसल्याने, ओला कचरा उघड्यावर साठून राहणे, दुर्गंधी पसरणे, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढणे आणि पर्यावरण तसेच सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण होण्याची समस्या उद्भवत आहे. ओल्या कचऱ्याचे स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करून प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १३७५ | १० | सांगोला नगरपरिषद हद्दीत वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. नगरपरिषद क्षेत्रातील अनेक भागांमध्ये अंतर्गत रस्ते निकृष्ट अवस्थेत आहेत किंवा अपूर्ण आहेत, तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावरील लाईटची अपुरी व्यवस्था असल्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्याचप्रमाणे शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले सीसीटीव्ही कॅमेरे पुरेशा प्रमाणात बसविण्यात आलेले नाहीत, त्यामुळे चोरी, गुन्हेगारी यांसारख्या घटनांवर नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. याशिवाय अनेक भागांमध्ये भूमिगत गटार व्यवस्था नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर वाहत राहते, परिणामी दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होत असल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १३८२ | १० | फुरसुंगी – उरुळी देवाची नगरपालिका ही अलीकडेच नव्याने स्थापन झालेली नगरपालिका असून या भागात मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढत आहे. नगरपालिका स्थापन होऊनही अनेक भागांमध्ये आवश्यक त्या मूलभूत नागरी सुविधा अद्यापही अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. विशेषतः या नगरपालिकेतील गणेश नगर व उत्तम नगर परिसरात नियमित व पुरेशा प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक नागरिकांना टँकरच्या पाण्यावर किंवा इतर पर्यायी साधनांवर अवलंबून राहावे लागत आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. या भागातील वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील गरज लक्षात घेता गणेश नगर व उत्तम नगर परिसरात जलवाहिनी टाकून नळाद्वारे नियमित व शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून फुरसुंगी– उरुळी देवाची नगरपालिका हद्दीत गणेश नगर व उत्तम नगर भागात जलवाहिनी टाकून नळ पाणीपुरवठा योजना तातडीने राबविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (६) | १२३६ | १० | जोगेश्वरी पूर्वमधील सार्वजनिक मैदाने क्रीडा पटूना खेळाडूंना प्रोत्साहन देण्याकरिता दहीहंडी साठी शासनाने खेळाच्या मैदानामध्ये (उदा. म्हाडा मैदान किंवा स्थानिक मनपा मैदाने) वापरण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) संबंधित विभाग कार्यालयाकडून परवानगी घ्यावी लागते त्यानुषंगाने सरावा करिता मैदान उपलब्ध करुन देण्या करिता आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | १४२४ | १० | जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रातील श्री गणेश तलावाचे विकास व सुशोभीकरण करणे ही परिसराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या प्रकल्पासाठी गाळ काढणे व जलशुद्धीकरण करणे तलावातील साचलेला गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढवणे आणि पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी ‘वॉटर प्युरिफिकेशन सिस्टिम’ बसवणे. तलावाच्या काठावर संरक्षक भिंत बांधणे, जॉगिंग ट्रॅक तयार करणे आणि नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था (बेंचेस) करणे. रात्रीच्या वेळी सुरक्षेसाठी आणि सौंदर्यासाठी आकर्षक ‘एलईडी’ दिवे आणि रोषणाई करणे. तलावाच्या बाजूने वृक्षारोपण करून हरित पट्टा विकसित करणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ११७२ | १०० | मुंबई महानगरपालिकेने फेब्रुवारी, २०२६ मध्ये सादर केलेल्या अर्थसंकल्पात बेस्टला आर्थिक मदतीचे विशेष पॅकेज मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येणे, पालिकेने गेल्या काही वर्षांत बेस्टला एकूण ११,३०४ कोटी रुपयांची तरतूद करण्याचे वर्तमानपत्रात दिसून आले असणे, त्या प्रमाणे बेस्टच्या सुमारे ४,००० पेक्षा जास्त निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी अद्याप प्रलंबित असणे, नोव्हेंबर, २०२५ मध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हक्काच्या पैशांसाठी बेस्ट भवनबाहेर अनेक वेळा आंदोलने केली असणे,.कामगार संघटनांनी ऑक्टोबर, २०२५ मध्ये ऑगस्ट, २०२२ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे लाभ त्वरित न दिल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल.याबाबत दिलेला इशारा, त्या अनुषंगाने बेस्ट प्रशासनामध्ये जवळजवळ निवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन व लाभ देण्यासाठी स्वतंत्र सुमारे १० हजार कोटी रुपयांची तरतूद करणेबाबत गरजेचे असणे, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबाची भावना अगदी रास्त दिसून येत असणे,ही परिस्थिती केवळ तांत्रिक किंवा आर्थिक नसून हजारो कुटुंबांच्या अस्तित्वाचा प्रश्न बनली असून कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबात शासनाबदल निर्माण झालेला हा रोष प्रमुख कारणांमुळे तीव्र होताना दिसून येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| (९) | ११७३ | १०० | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत आणि लाभांबाबत सध्याची परिस्थिती गंभीर असून, फेब्रुवारी, २०२६ मध्ये मुंबईतील विविध संस्थांच्या निवृत्त कर्मचाऱ्यांनी पेन्शनच्या प्रश्नावर आझाद |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मैदानावर केलेली आंदोलने, 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना' यांसारख्या संघटनांनी पालिका आयुक्तांकडे या प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची मागणी करणे,अनेक ज्येष्ठ नागरिकांना निवृत्तीनंतरच्या आजारपणाच्या खर्चासाठी या पैशांची नितांत गरज असणे,पेन्शनअभावी त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असणे,नवीन पेन्शन योजना (NPS) आणि जुनी पेन्शन योजना (OPS) यामधील वादांमुळेही कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांमध्ये भविष्याबद्दल भीती निर्माण होणे, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांमध्ये मोठा असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ११८६ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील प्रताप नगर येथील हिंदू स्मशानभूमीच्या जागेचे संपादन आणि पुनर्विकासाबाबतची स्मशानभूमीसाठी भूखंड आरक्षित आहे, मात्र या जागेचे पूर्णतः संपादन प्रक्रिया तांत्रिक कारणांमुळे दीर्घकाळ प्रलंबित राहिली आहे.याकरिता मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला (BMC) स्मशानभूमी आणि दफनभूमीसाठी आरक्षित असलेल्या भूखंडांबाबत १५ दिवसांच्या आत सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश दिले होते, जेणेकरून भविष्यातील गरज पूर्ण होऊ शकेल.जेणे करून विकास आराखड्यात (Development Plan) एकदा जागा स्मशानभूमीसाठी आरक्षित झाली की, ती अन्य कोणत्याही कारणासाठी वापरता येत नाही, जोपर्यंत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होत नाही त्या कारणाने स्थानिक येथील प्रताप नगर हिंदू स्मशानभूमीची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय आहे, पर्यायी व्यवस्था जागेच्या अभावामुळे किंवा प्रलंबित कामामुळे नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी पारशीवाडा (जोगेश्वरी) किंवा गोरेगाव येथील स्मशानभूमीचा आधार घ्यावा लागतो.ज्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात हाल सोसावे लागत आहेत स्मशानभूमी करिता आरक्षित असलेल्या जागेचे संपादन करणे बाबतची प्रक्रिया अनेक वर्षापासून प्रलंबित असून ती तातडीने लवकरात लवकर पूर्ण करणे अत्यंत गरजेचे असून जेणे करून स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सातत्याने मागणी होत असून याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून येथील संपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाला असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ११८८ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील आरे वसाहती मधील रस्ते जी मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये समाविष्ट असताना त्या रस्त्यांची जागा हस्तांतरित करून रस्त्यांचे विकास करण्या करिता निधीची तरतूद करून सदर रस्त्याचे विकास करण्या बाबत तातडीने यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१२) | १२९६ | १० | मुंबई शहर व उपनगरातील नालेसफाईचे काम असमाधानकारक झाले असणे, नालेसफाईचे काम केवळ १० ते ३० टक्के झाले असणे, गेल्या ४० दिवसात नालेसफाईचे काम फक्त १० टक्क्यापेक्षा जास्त झाले नसणे, कंत्राटदाराकडून निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास झाले असणे, नालेसफाईची कामे वेळेत होणे आवश्यक असणे मात्र याठिकाणी तसे दिसून आले नसणे, नाल्याची लांबी, रुंदी ऊंची व खोली कशी मोजली जात असणे, त्याचप्रमाणे या संदर्भात ठेकेदार काहीच दाखवत नसणे, मात्र कंत्राटदांराना देयके मोठया प्रमाणावर अदा केली जात असणे, संबंधित अधिकारी व नालेसफाई कंत्राटदार यांचे संगनमत असणे, परिणाम स्वरुप नालेसफाईचे काम होत नसणे, त्यामुळे शहर व उपनगरात पाणी साठवण्याची भिती निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १२९७ | १० | मुंबईतील वर्सोवा ते मढ प्रस्तावित सागरी किनारा मार्गासाठी सातबंगला (वर्सोवा) येथील २० वर्षे जुन्या नाना-नानी पार्क उद्यानातील १८४ झाडे कापली जाणार असल्याचे दि.२५/२/२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अंधेरी पश्चिमेकडील जुहू वर्सोवा लिंक मार्गावर वर्सोवाकडे जाताना नाना-नानी पार्क हे उद्यान स्थानिकांनी जतन केले असणे, येथे चालण्यासाठी स्वतंत्र पट्टा व इतर सुविधा असणे, आता विकासाच्या नावाखाली या उद्यानाचे अस्तित्व धोक्यात येणे, यातून स्थानिकांनी निदर्शने, आंदोलने सुरु केली असणे, परंतु शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | १२९८ | १० | मुंबई शहर, उपनगर येथील फेरीवाल्यांच्या विविध समस्या असणे, फेरीवाल्यांच्या समस्यांवर तोडगा काढणे, महाराष्ट्र पथ विक्रेता कायद्याची अंमलबजावणी करणे, शहर फेरीवाला समिती गठीत करणे, शहर फेरीवाला झोन तयार करणे, या संदर्भात महाराष्ट्र हॉकर्स फेडरेशन संलग्न नॅशनल हॉकर्स फेडरेशन, मुंबई यांनी मा.मुख्यमंत्री, अप्पर मुख्य सचिव, नगरविकास विभाग व पालिका आयुक्त, म.न.पा, मुंबई यांच्याकडे दि.३०.०७.२०२४ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असणे, फेरीवाले गत 10 वर्षापासून त्यांच्या हक्का पासून वंचित राहिले असणे, फेरीवाल्यांच्या समस्यावर तोडगा काढण्यात यावा असे निर्देश मा. उच्च न्यायालय माहे जानेवारी, २०२५ मध्ये दिले असणे, तथापि याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी फेरीवाले व स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१५) | १३०० | १० | मुंबई सेन्ट्रल येथील बीआयटी चाळीच्या एकूण १९ इमारती असणे, या इमारती बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अखत्यारीतील भूखंडावर असणे, सदर इमारतीमधील कुटुंबे किमान २ ते ३ पिढ्यांपासून तेथे वास्त्यव्य करीत असणे, या सदनिका त्यांना मुंबई पोलीस, रेल्वे पोलीस व इतर विभागामार्फत राहण्यास दिल्या असणे, सदर चाळींना १०० वर्षे पूर्ण झाली असणे, त्यांची सध्याची अवस्था पाहता त्यांचा पुनर्विकास होणे गरजेचे असणे, या १९ इमारतीमध्ये जवळपास १५५२ भाडेकरू रहात असणे, त्यामुळे इमारतीच्या झालेल्या दुर्दशेमुळे त्यांना तेथे जीव मुठीत घेऊन राहावे लागत असणे, बीआयटी चाळीतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या पुनर्विकासासंदर्भात लवकरात लवकर निर्णय होणे गरजेचे असणे, त्यांना किमान ५०० चौ.फु. घरे देण्यात यावीत तसेच सदर घरे स्वमालकीची असावीत अशी त्यांची विनंती वजा मागणी असणे, यासंदर्भात शासन स्तरावर पत्र व्यवहार सुरु असणे, परंतु अद्याप त्यावर प्रत्यक्ष कारवाई न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१६) | १३७४ | १० | साकोली नगर परिषद व लाखनी-लाखांदूर नगरपंचायतः- शहरांमध्ये योग्य प्रशासकीय इमारतींची उभारणी नसणे, कव्हर असलेले गटारे नसणे, पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून सांडपाणी निचरा व्यवस्था नसणे, रस्ते डांबरीकरण व सिमेंट रस्ते बांधकाम अपुर्ण असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | १३७९ | १० | बाजारपेठ व सार्वजनिक सुविधा विकास साकोली, लाखनी व लाखांदुर शहरांत आधुनिक सब्जी मार्केट, सार्वजनिक शौचालये, बसथांबे विकसित नसणे, विक्रेत्यांसाठी हॉकर्स झोन तयार नसणे. (जेणेकरून वाहतूक कोंडी कमी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | १३८६ | १० | भंडारा व गोदिया जिल्हयातील नागरी भागातील स्वच्छता व सौंदर्गीकरणः प्रत्येक प्रभागासाठी पुरेसे स्वच्छता कर्मचारी नसणे, शहरातील उद्याने, तलाव विकासासाठी निधी उपलब्ध नसणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | १३९४ | १० | सार्वजनिक ठिकाणी अग्निसुरक्षा उपकरणांची दयनीय स्थिती साकोली, लाखनी व लाखांदूर शहरातील शासकीय कार्यालये, बाजारपेठ, शाळा, सभागृहे व इतर सार्वजनिक ठिकाणी अग्निशमनासाठी आवश्यक फायर सिलेंडर (Fire Extinguisher) बाबत गंभीर त्रुटी आढळून येणे. काही ठिकाणी फायर सिलेंडर मुळीच उपलब्ध नसणे काही ठिकाणी आहेत, परंतु नियमित तपासणी व देखभाल नसल्यामुळे निष्क्रिय अवस्थेत असणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२०) | १२७२ | १० | ५०९ चौक ते कलवड–धानोरी–लोहगाव हा सुमारे अडीच कि.मी. लांबीचा व ३० मीटर रुंदीचा रस्ता दिनांक ७ मे, २०१२ रोजी महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २०५ अंतर्गत स.नं. २४२, २४५, २४६, २४७ व २६९ मधून विकास आराखड्यात समाविष्ट करण्यात आलेला आहे. मात्र मागील सुमारे १४ वर्षांपासून हा रस्ता प्रत्यक्षात विकसित झालेला नाही. या रस्त्यामुळे धानोरी, कलवड, विश्रांतवाडी, लोहगाव, वडगाव शिंदे, निरगुडी, चऱ्होली तसेच पिंपरी-चिंचवड परिसराशी थेट संपर्क निर्माण होणार आहे. रस्ता प्रलंबित असल्यामुळे नागरिकांना मोठा फेरा मारून प्रवास करावा लागतो व वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय आणि इंधन खर्च वाढत आहे. म्हणून महापालिकेने महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७२ (ब) अंतर्गत निधी उपलब्ध करून सदर रस्त्याचे काम तातडीने सुरू करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | १२७३ | १० | धानोरी व लोहगाव या दोन गावांच्या हद्दीवरून जाणारा व पोरवाल रोडला समांतर असणारा भारत माता रोड अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सदर रस्त्यासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रियेत जागामालकांना योग्य मोबदला न मिळाल्यामुळे काम रखडलेले आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास धानोरी, लोहगाव तसेच परिसरातील वाढती वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय व नागरिकांची गैरसोय वाढत आहे. म्हणून सदर रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून रस्त्याच्या कामास त्वरित सुरुवात करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | १२७४ | १० | लोहगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा–निरगुडी रोड ते खंडोबा माळ हा रस्ता अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सदर रस्त्यावर वारंवार लहान-मोठे अपघात होत असून नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ऑक्टोबर, २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रारूप विकास आराखड्यामध्ये या रस्त्याचा समावेश नसल्यामुळे जागामालकांना मोबदला मिळत नाही आणि त्यामुळे रस्त्याचे काम रखडलेले आहे. परिणामी परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता हा रस्ता किमान १२ मीटर रुंदीने प्रारूप विकास आराखड्यात समाविष्ट करावा अथवा महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २०५ अंतर्गत त्याची आखणी करून काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२३) | १२७५ | १० | शिवणे–खराडी हा महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असून वडगाव शेरी परिसरामध्ये जागा ताब्यात न मिळाल्यामुळे हा रस्ता अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजी पुणे महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली भूसंपादनासंदर्भात द्वितीय बैठक घेण्यात आली होती. मात्र त्यानंतरही पथविभागाकडून पुढील कार्यवाहीत अपेक्षित गती दिसून येत नसल्यामुळे रस्त्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही. परिणामी परिसरातील नागरिकांना वाहतुकीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून रस्त्याचे काम तातडीने सुरू करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | १२७६ | १० | आळंदी ते पंढरपूर हा पालखी मार्ग वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाचा असून दरवर्षी लाखो वारकरी या मार्गाने पायी वारी करतात. मात्र दिघी–पिंपरी चिंचवड हद्द ते कळसगाव (पुणे मनपा हद्द) या दरम्यानचा रस्ता अरुंद असून वाहतुकीच्या दृष्टीने गंभीर अडचणी निर्माण होत आहेत. सदर मार्गालगत संरक्षण विभागाची जमीन असल्यामुळे रस्ता रुंदीकरणाचे काम प्रलंबित आहे. त्यामुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा तसेच वाहतुकीच्या सुरळीततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर संरक्षण विभागाची आवश्यक जमीन हस्तांतरित करून आळंदी–पंढरपूर पालखी मार्गाचे रुंदीकरण तातडीने करणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | १२७७ | १० | लोहगाव परिसर अतिशय जलद गतीने विकसित होत असून येथे नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लोहगाव पोलीस चौकी व मुख्य चौक परिसरात दररोज मोठ्या संख्येने नागरिकांची ये-जा होत असते. तसेच या ठिकाणी बसथांबा, पोलीस चौकी व इतर सार्वजनिक सेवा केंद्रे असल्यामुळे नागरिकांची सतत गर्दी असते. मात्र या परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृहाची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे महिला, पुरुष, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसाठी लोहगाव पोलीस चौकी परिसरात महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | १२७८ | १० | लोहगाव हे सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाले असले तरी येथे पिण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. लोहगाव परिसरातील डायमंड वॉटर पार्क येथे प्रस्तावित पाण्याच्या टाकीचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरू असून सदर प्रकल्पासाठी निश्चित केलेली जागा वारंवार बदलली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जात असल्यामुळे कामात विलंब होत आहे. परिणामी प्रकल्प अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीचा विचार करून सदर पाण्याच्या टाकीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक निर्णय घेऊन कामाला गती देणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | १२७९ | १० | खराडी बायपास मुख्य रस्त्यालगत शासकीय जागा उपलब्ध असून सदर चौक हा अत्यंत वर्दळीचा आहे. या परिसरातून दररोज हजारो नागरिकांची ये-जा होत असते. तसेच आसपास व्यावसायिक आस्थापना, कार्यालये व वाहतुकीची मोठ्या प्रमाणात हालचाल असल्यामुळे नागरिकांची गर्दी सतत असते. मात्र या परिसरात सार्वजनिक स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे महिला, पुरुष तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत असून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही ही बाब गंभीर आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध शासकीय जागेवर महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | १२८० | १० | स्थानिक मतदारसंघातील येरवडा येथील जय जवान नगर परिसर दाट लोकवस्तीचा असून येथील डोंगराळ भाग अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. या ठिकाणी संरक्षण भिंत, कुंपण तसेच सूचना फलकांचा अभाव असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मुलांसाठी सुरक्षित खेळाचे मैदान उपलब्ध नसल्यामुळे अनेक मुले डोंगरावर खेळण्यासाठी जातात आणि वारंवार अपघात घडत आहेत. दिनांक ७ फेब्रुवारी, २०२६ रोजी श्रेयस शेखर भोसले (वय ११ वर्षे) या बालकाचा डोंगरावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यापूर्वीही अशा घटना घडल्या असून संबंधित कुटुंबाला कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर डोंगर परिसरात संरक्षण भिंत व कुंपण उभारणे, सूचना फलक व सीसीटीव्ही बसवणे, मुलांसाठी सुरक्षित उद्यान विकसित करणे तसेच मृत बालकाच्या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | १२८१ | १० | वडगाव शेरी मतदारसंघातील येरवडा, शांतिनगर, प्रतीक नगर, कळस, धानोरी, मुंजाबावस्ती, बर्मासेल, संजय पार्क, यमुना नगर, वडगाव शेरी गावठाण व परिसर, काळुबाई नगर, खराडी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत तसेच खुळेवाडी या भागांमध्ये सुमारे ४० वर्षांपूर्वी टाकण्यात आलेल्या ड्रेनेज लाईन सध्या अत्यंत जुना व कमी क्षमतेचा झालेला आहे. या लाईन मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाल्यामुळे वारंवार ड्रेनेज चोकअप होण्याच्या घटना घडत असून नागरिकांना अस्वच्छता व आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे विद्यमान |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | लाईनची क्षमता अपुरी पडत आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता संबंधित ठिकाणी निधी उपलब्ध करून जुन्या ड्रेनेज लाईन काढून नवीन मोठ्या व्यासाच्या ड्रेनेज लाईन टाकणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (३०) | १३२७ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील टागोर नगर येथील हरियाली नाला रुंदीकरणाची काम सुरु असणे, याकरिता निष्कासनाची कार्यवाही करतांना बाधितांना एस विभागाच्या हददीमध्ये सदनिका उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही झाल्यानंतर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुनही अदयाप कार्यवाही न होणे, परिणामी बाधितांमध्ये प्रचंड असंतोष ,तयांनी निष्कासनास केलेला विरोध ,याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून प्रथम बाधितांचे पुनर्वसन करुन सदनिका उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | १३२८ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील टागोर नगर येथील हिंदू स्मशानभूमीमधील विदयुत शववाहिनी गेल्या अनेक वर्षापासून बंद असणे, याबाबत जिल्हा नियोजन बैठकीत तसेच संबंधिताना पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही न होणे,परिणामी अनेक अडचणी येत असणे, याबाबत शासनाने तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता, सदर शववाहिनी तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | १३२९ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील विक्रोळी, गावठाण, विक्रोळी जुने पोलीस स्टेशन, जेव्ही.एल .आर , विक्रोळी –कांजुरमार्ग ,भांडूप ,गोदरेज ट्री, या पूर्व द्रुतगती मार्गावरील पादचारी पुलांची अत्यंत जीर्ण व मोडकळीस आलेले असून कोणत्याही क्षणी कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता असणे, सदर पुलाचे तात्काळ नुतनीकरण करणे गरजेचे असल्याने त्याकरिता भरीव निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.. |
| (३३) | १३३५ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या विक्रोळी मतदार संघातील सुर्यानगर ही वस्ती डोंगराळ भागावर वसलेली असल्याने रहिवाशांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खुप गंभीर असणे, यापूर्वी लोकप्रतिनिधीनी वारंवार शासनाचे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधुनही कार्यवाही न होणे, सुर्यानगरसाठी जलकुंभ बांधण्याबाबत निधीची तरतुद झालेली नसणे, .त्यामुळे पाणी पुरवठा समस्या या भागात भेडसावत असणे, याबाबत तात्काळ लक्ष घालून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३४) | १२८७ | १० | मौजे एरंगळ, ता.बोरीवली, मालाड (प.), मुंबई न.भू.क्र.१९६५,२०५३/बी सी सी१ इ, डी, २०५५/बी व सी २०४० येथे मे. रेहजा युनिर्व्हसल प्रा.लि.यांचेमार्फत बेकायदेशीर कामे सुरु असणे, ही कंपनी येथे अनाधिकृत बांधकाम, खनन, डम्पिंग व अनधिकृतपणे आरएमसी प्लॉट चालवीत असणे, म्हणून हे काम महानगरपालिकेने थांबवणे, तसेच कांदळवन परिसरात अनधिकृतपणे ड्रेनेज व बांधकाम कचरा डंप करीत असणे, आवश्यक परवानग्या व रॉयल्टी न भरता बेकायदेशीर खनन-उत्खनन करीत असणे, परिणामी येथे पर्यावरणाची हानी होऊन कांदळवन परिसंस्थेतील जैव विविधतेला धोका निर्माण करीत असणे, त्यामुळे या कंपनीवर शासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत असतानाही त्यावरील कारवाईस होत असलेला विलंब, करीता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | १२८८ | १० | लुर्डेस कॉलनी, ओर्लेम, मालाड (प.) येथील लेन क्र.१ येथे (बीकॉन सीएचएस) ला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी अत्यंत जीर्ण होणे, ही जलवाहिनी पूर्णपणे गंजलेली असून त्यामध्ये मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असणे, परिसरातील रहिवासी सोसायटयांनी रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यापूर्वी ही जलवाहिनी बदलून जास्त व्यासाची नवी जलवाहिनी टाकण्यासाठी केलेली मागणी, परंतु शासनाकडून होत असलेला विलंब याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | १२८९ | १० | मुंबईतील मालवणी,मालाड (प.) हा भाग मोठया प्रमाणावर झोपडपट्ट्यांनी व्यापलेला असून येथे फार मोठया प्रमाणावर मोकळया जागा नसणे, त्यामुळे शासनाने येथील (१).डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, (२).मोहम्मद रफी उद्यान, (३).अल्लमा शिवजी नोमणी उद्यान, (४).मौलाना अब्दुल कलाम उद्यान, (५).आक्सा उद्यान, (६).म.वा.देसाई उद्यान, (७).अण्णा सावंत मनोरंजन उद्यान, (८).गावदेवी लोटस तलाव उद्यान या उद्यान व क्रिडांगणाचा पायाभूत सुविधांचा विकास करण्याकरीता विशेष निधीची तरतूद करावी, अशी असलेली मागणी, परंतु शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामीव्यक्त होत असलेला विलंब, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (३७) | १२९० | १० | मोठे गार्डन (अजय बिल्डिंगच्या बाजूला व शुभांगण इमारतीच्या समोर) जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम), मुंबई येथे असून सदरचे गार्डन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, लाईटींगची व्यवस्था करणे, साफसफाई करणे, शौचालयाची व्यवस्था करण्याची आवश्यकता निर्मा◌ाण झाली असणे, वरिष्ठ नागरीकांना व इतराना बसण्याची व्यवस्था करणे, त्याठिकाणी अनाधिकृत बांधकामे झाली असणे, सदरचे बांधकाम करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, गार्डनचा विकास |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आराखडा तयार करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, अत्याधुनिक गार्डन करण्याची गरज असणे, सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | १२९१ | १० | मुंबई मालाड (प.) येथे मार्वे टी जंक्शन ते पोसरी तलाव पर्यंत खारफुटीच्या संरक्षणासाठी मार्वे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वन विभागाचे कम्पाऊंड वॉलचे बांधकाम सुरु असणे, येथे २७.४५ मीटर रुंदींचा रस्ता असणे, तेथे वन विभाग रस्ता बांधत असणे, ही भिंत बांधण्यावर फक्त १८-३० मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध होणार असणे, तसेच २०.४५ मीटर रुंदीचा रस्ता बांधण्यासाठी सिमेंट काँक्रीट रोड बांधण्याचे टेंडर काढण्यात येणे, तसेच खारफुटीच्या पुर्नलागवणीचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या रस्ते विभागाने सादर करणे, त्यामुळे भिंत बांधण्यास राज्य शासनाचा निधी वाया जाणार असणे, म्हणून हे काम महानगरपालिकेने थांबवून रस्ता बांधल्यानंतर आरएल नुसार भिंत बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना. |
| (३९) | १२९३ | १० | मुंबई उपनगर मौज आक्से, ता. बोरीवली स.नं. १५ व १६, न.भु.क्र. १२ पे. १२/१ व मोजे. मालवणी ता. बोरीवली, स.नं. २९८ व २६३. न. भू. क्र. ३५५२ व ३५५४ या मिळकतीवर मुस्लिम दफनभूमी, शिया मुस्लिम दफनभूमी, ख्रिश्चन दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी विकसीत करणेबाबत दिनांक ११/०८/२०२५ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेअंती मा. मंत्री (महसूल) यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास अहवाल सादर करण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असणे, परंतु आजतागायत शासनास अहवाल सादर करण्यात आलेला नसणे, परिणामी दफनभूमी व स्मशानभूमीच्या विकास कामांना विलंब होत असणे, त्यामुळे सदरील काम म.न.पा.कडून सुरु करण्यात न येणे, एका वर्षाच्या आत नवीन मृतदेह दफनभूमीत आले तर जुने मृतदेह योग्यरित्या कुजलेले नसल्याचे आढळून येणे, याकरीता अंबोजवाडी येथे नवीन दफनभूमी व स्मशानभूमीची मागणी होत असणे, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे व नाराजीची भावना, याबाबत महसूल विभागाने तातडीने निर्णय घेऊन लवकरात लवकर शासनाला दफनभूमी व स्मशानभूमीच्या विकासाचे काम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४०) | १२९४ | १० | मुंबईतील मालाड (पू.) पश्चिम द्रूतगमी मार्गावरील हिमाला टाईल कम्पाऊंड येथे. न.भू. क्र.२२७ या माजास गावात दफन भूमीसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर एम.जी.मोटर या कंपनीने वाहन विक्रीचा मोठा शोरुम उभारणे, वास्तविक या जमिनीची महानगरापालिका विकास आराखडयामध्ये ही जमीन दफनभूमीसाठी आरक्षित असल्याची नोंद असणे, यापूर्वी २०/३/२०१४ रोजी महानगर पालिकेने या जमिनीवरील भारती ऑटोमोबाईल कंपनी लि.यांचे अतिक्रमण निष्कासीत केले असणे व दफन भूमीसाठी जागा मोकळी करणे, परंतु दरम्यानच्या काळात दफन भूमीचा विकास झाला नसल्याने या मोकळया जागेवर पुन्हा एम.जी.मोटर यांनी अनधिकृत शोरुम उभारणे, यासंदर्भात अल्पसंख्यांक समाजाच्या तक्रारी असणे व समय फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने या जमिनीवर दफनभूमी विकसीत करावी, मुंबई महानगरपालिका याबाबत अपयशी असणे, यामुळे स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना, तसेच स्थानिक रहिवाशांनी व समय फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने या जमिनीवर दफनभूमी विकसीत करावी, अशी आग्रहाची मागणी केली असणे, यासाठी शासनाने या जमिनीवरील अतिक्रमण निष्कासीत करावी व या आरक्षित जमिनीवर दफनभूमी विकासीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | १३२० | १० | मुंबईतील वरळी येथील जिजामाता गृहनिर्माण संस्था, श्री विवेकानंद नगर सहकारी गृहनिर्माण संस्था, वीर जीजामाता नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि माता रमाबाई नगर सहकार गृहनिर्माण संस्था येथील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी येथील महापालिकेच्या जमिनीवर विकासक वरळी अर्बन डेव्हलमेंट प्रोजेक्ट एलएलपी यांनी पुनर्विकास प्रकल्प हाती घेतला असणे, येथे विकासकाने पालिकेच्या आक्षेपांना न जुलामना एसआरएने ११ एप्रिल,२०२५ रोजी येथे सात संक्रमण इमारतींना मंजूरी देणे, मार्च २०२५ मध्ये विकासकला काम थांबविण्याच्या सुचना दिल्यानंतरही ही मंजूर देण्यात येणे, हे करताना पालिकेच्या दाव्यांबदल काही स्पष्ट उल्लेख केलेला नसणे, हा सर्व प्रकार शासाच्या डोळयात धुळफेक करणारा असणे, यांसदर्भात पालिकेच्या तक्रारी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनमानसात व्यक्त होणारा रोष व नाराजीची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४२) | १३२१ | १० | मुंबईतील मालाड (प.) हे अत्यंत वर्दळीचे ठिकाण असणे, येथे महिला व मुली यांची कामानिमित्त ये-जा असणे, परंतु येथील परिसरात अंधाऱ्यारात्रीत सुरक्षा नसणे, म्हणून (१).मालवणी पोलीस चौकी नाका, (२).सवेरा टॉकीजसमोर (३).गेट नं.८ येथील बस डेपासमोर, (४).गेट नं.८ म्हाडा नाका, कला विद्यालय मार्ग, (५).म्हाडा मैदान आर. एस.सी. ९ क्लासिक बिल्डिंग मागे (६). भूजाले तलाव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | परिसरात या स्थानांवर हायमास्ट दिवे बसविण्याची तसेच मालाड (पश्चिम), चारकोप नाका, मार्वे रोड येथील हिंदू स्मशानभूमी, मुस्लिम व ख्रिस्ती दफनभूमी परिसरात सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्याची मागणी असणे, त्यासाठी नागरीक, मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी मनपा अधिकाऱ्यांकडे रितसर मागणी केली असणे, मात्र शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, पणिामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १२ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई